## प्रकरण पाचवे

## अण्णाभाऊ साठे यांची इतर शाहिरी रचना

### प्रस्तावना

कथा, कादंबरी या वाङ्मयप्रकाराबरोबर अण्णाभाऊ साठे यांची शाहिरी वाङ्मयामधील कामगिरी अत्यंत मोलाची आहे. शाहिरी वाङ्मयाचा एक भाग म्हणून यापूर्वी आपण लोकनाटयाचा विचार केला. या लोकनाटयाशिवाय पद्य स्वरूपाची जी रचना अण्णाभाऊ साठे यांनी केली आहे. त्याचा अभ्यास येथे प्रस्तुत आहे. त्यात गण, गौळण, लावणी, पोवाडा, यांचा समावेश होतो. अण्णाभाऊंच्या अस्सल कसदार लेखनाची सर्व वैशिष्टये त्यांच्या शाहिरी रचनेतून प्रकट होताना दिसतात. त्यांच्या शाहिरी रचनेचे लेखन साधारणपणे १९४२ ते १९६९ पर्यंत झालेले दिसते.

अण्णाभाऊ साठे यांच्या शाहिरी काव्याच्या प्रत्येक चरणा-चरणात विद्रोही आणि क्रांतिकारी विचार आहेत. अण्णाभाऊंना अभिप्रेत असणारा विचार हा उद्याचा कामगार, कष्टकरी जनता, दलित जनता ही दास्यातून गुलामगिरीतून मुक्त झाली पाहिजे. या विचारांशी अण्णाभाऊंच्या शाहिरी वाङ्मयाची बांधिलकी असलेली दिसते. म्हणजे जनतेशी बांधिलकी पत्करून समाजामध्ये प्रबोधन

घडविणे हेच अण्णाभाऊंच्या शाहिरी वाङ्मयाचे विशेष आहे.

त्यादृष्टीने अण्णाभाऊंच्या शाहिरी रचनेतून म्हणजे गण, गौळण, लावणी आणि पोवाडा यातून कोणता नवा आविष्कार व्यक्त झाला आहे. त्याचे स्वरूप कोणत्या प्रकारचे आहे. या बाबींचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्याचा हेतू आहे.

१. गण :

अण्णाभाऊ साठे यांनी पारंपरिक तमाशातील गणाचे स्वरूप स्वीकारले. पण त्याचे अधिष्ठान मात्र बदललेले दिसते. पारंपरिक गणामध्ये देवदेवतांचे स्तवन आणि वंदन केले जात होते. पण अण्णाभाऊंनी मात्र देवदेवतांच्याऐवजी मातृभूमी, देशभक्त, हुतात्मे, राष्ट्रवीर याना वंदन करून त्यांचेच स्तवन केले व त्यांच्याकडूनच आशीर्वाद मागितलेला दिसतो.

उदा. " प्रथम मायभूच्या चरणा
छत्रपती शिवबा चरणा
स्मरोनि गातो । कवना ।। धृ ।।
..... ......
क्रांतिकारी वीराना आणि त्यागी भूषणा ।
पणा लावुनिया प्राणा ।
अर्पियले ज्यांनी जीवनां ।। १ ।।
आठवून मनी ही शुभनामें करुनिया स्तवना
आशिर्वाद मागतो आम्ही गावया कवना
सभापती आणि रसिकांना
स्फुर्ती धावी हीच प्रार्थना "[१]

समकालाशी एकरूप होऊन अण्णाभाऊंनी रचलेला वरील प्रकारचा गण हा वास्तवाचे समर्थ दर्शन घडवितो. कम्युनिस्ट विचार सरणीशी सुसंगत ठरेल अशात-हेचा बदल अण्णाभाऊ साठे यांनी गणाच्या लावणीत केला आहे.

२. म्हणणी :

पारंपरिक तमाशामध्ये " गण " संपल्यानंतर लगेच गौळणीला सुरवात होते. त्याचे स्वरूप आपण यापूर्वी पाहिले आहे.

अण्णाभाऊंनी मात्र आपल्या शाहिरी रचनेमध्ये " गौळण" हा रचना प्रकार पूर्णपणे वगळलेला दिसतो. कारण पारंपरिक गौळणीमध्ये श्रृंगाराचा भाग अधिक होता. परमेश्वराच्या अवतार कल्पनेवर अण्णाभाऊंचा विश्वास नसल्याने त्या कल्पनेचा वापर असलेली गौळण अण्णाभाऊंची नाकारली व गौळणीच्या ऐवजी आपल्या नव्या तमाशात अर्थात लोकनाटयामध्ये " म्हणणी " आणली. " म्हणणी" म्हणजे प्रवेश परिचयाचे काव्यात्म कथासूत्र होय. यामध्ये एक पद्यरूप कवन असते. या कवनातून प्रयोग सुरु होण्यापूर्वी लोकनाटयातील कथानकाचा पूर्ण परिचय करुन दिला जातो. उदाहरणार्थ त्यांच्या " अकलेची गोष्ट " या लोकनाटयामध्ये " म्हणणी " पुढील प्रमाणे आढळते.

" खानदेशामधी गाव राजुरी खेडे एक लहान ।
त्या गावाची गोष्ट सांगतो ध्यावी ऐकून ।। १ ।।
एक सावकार, दुसरा गवळी असे दोघेजण ।
मित्र जिवाभावाचे नांदत होते आनंदान ।। २ ।।
करती काळा बाजार दोघांचे नफयावर ध्यान ।
स्वार्थासाठी शेतक-यांची मुरगळती मान ।। ३ ।।[२]

वरील प्रकारची " म्हणाणी " काही लोकनाटये वगळता सर्वच लोकनाटयामध्ये आढळते. या " म्हणाणी " मधून कथानकाचे कथासूत्र प्रयोगापूर्वी कथन केल्यामुळे कथानकाचे आकलन होण्यास मदत होते. ही भूमिका लक्षात घेऊन अण्णाभाऊंनी " म्हणाणी " वर भर दिला असावा. असे वाटते. " म्हणाणी " मधून सुचित केलेले कथानक हे पात्रांच्या कृतियुक्तितून आणि घटनांतून पुढे प्रयोगरूप होते.

३. लावणी :

अण्णाभाऊ साठे यांनी संख्यात्मकदृष्टया कमी पण गुणवत्तेच्या दृष्टीने अधिक चांगल्या लावण्या रचल्या आहेत. लावणी रचनेमध्ये अण्णाभाऊंनी पारंपरिक लावणीचा घाट स्वीकारला. पण त्यातील आशयामध्ये मात्र प्रचंड बदल केलेला दिसतो. पारंपरिक लावणी ही प्रेम, विरह इत्यादी गुणांनी युक्त आहे. तसेच ती शृंगारिक आहे. पण अण्णाभाऊंच्या लावणी रचनेचा विचार करता त्यांची लावणी ही काल्पनिकतेमध्ये रमत नाही, तर ती वास्तवाचे जिवंत दर्शन घडविते. त्यामुळे अण्णाभाऊंची लावणी ही कुलीन, संस्कारी व प्रबोधनपर अशीच ठरते.

अण्णाभाऊंनी लोकनाटयातील कथानक आणि कथानकाला प्रसंगानुरूप लावणी याची कलात्मक गुंफण केलेली दिसते. त्यामुळे त्यांच्या स्वतंत्र अशा फारच थोडया लावण्या आढळतात. त्या पुढीलप्रमाणे

१. सुगी
२. मुंबईची लावणी
३. माझी मैना गावावर राहिली.
४. कथा मुंबईची
५. साता-याची त-हा.

१. सुगी :

ही अण्णाभाऊंची पहिलीच लावणी १९४२ मधील आहे. पण आज ती उपलब्ध नाही.

२. मुंबईची लावणी:

अण्णाभाऊंनी जेव्हा मुंबईकडे पहाण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्याठिकाणीही समाजव्यवस्थेतील मूलभूत फरक त्यांच्या ध्यानात आला. याचे दर्शन या लावणीत घडते. अण्णाभाऊंनी प्रस्तुत लावणीचा सरळ दोन भागात विकास घडविलेला दिसतो. प्रत्येक चरणात परस्पर विरोधी अशी विषमतेची दोन टोके कलात्मक पध्दतीने दर्शविली आहेत. त्यामुळे अण्णाभाऊंच्या कलात्मक लेखन सौंदर्याचे दर्शन प्रस्तुत लावणीतून घडते.

या लावणीमध्ये मुंबईतील विषमतेचे, दारिद्र्याचे, कामगारांच्या वेदनेचे, त्यांच्यावरील होणा-या अन्यायाचे आणि भांडवलदार व श्रीमंत यांच्या सुखविलासाचे तुलनात्मक दर्शन घडविले आहे. कामगाराची झोपडपट्टीतील लोकांची व हमालांची सुखदु:खे त्यांच्या व्यथा आणि जीवन संघर्षाच्या सर्व वाटेवरती त्यांच्या उमटलेल्या पाऊलखुणा याचे हृदयद्रावक दर्शन या लावणीमध्ये आले आहे. लावणीच्या पहिल्याच चरणात मुंबईतील विषमतेचे भेदक शब्दात दर्शन घडते.

" मुंबईत उंचावरी । मलबार हिल इंद्रपुरी ।
कुबेरांची वस्ती तिथं सुख भोगती ॥
परळात राहाणारे । रात दिवस राबणारे ।
मिळेल ते खाऊनी घाम गाळती ॥ १ ॥ [3]

वरील विवेचनावरुन सामाजिक विषमतेचे दाहक रूप अतिशय कठोर शब्दात अण्णाभाऊंनी व्यक्त केलेले दिसते.

मुंबईतील वैभव हे अनेक माणसांना भुरळ पाडणारे आहे. पठ्ठे बापूराव सारख्या शाहिरांनी मुंबईच्या वैभवाचे रसभरीत वर्णन आपल्या लावणीतून केले आहे. पण अण्णाभाऊंची दृष्टी ही केवळ मुंबईच्या वैभवावर खीळलेली नाही. तर रात्रंदिवस घाम गाळून हे वैभव उभा केलेल्या कष्टकरी वर्गावर खिळलेली आहे. मुंबईतील प्रशस्त रस्ते, गल्लीबोळ, मोटारगाडया, विमाने आणि रस्त्यावर टाचा घासून मरणारी टांग्याची घोडी, काबाडकष्ट करणारे हमाल तसेच श्रीमंतांच्या चंदनवाडी, सोनापूर या स्मशानभूमी आणि टाचा घासून मरणा-या बेवारशी लोकांची समुद्रकाठी होणारी सोय. याचे वास्तवदर्शन प्रखर शब्दांत घडविले आहे. धनीकांच्या गगनचुंबी इमारती व त्यांच्या पायथ्याला पसरलेल्या झोपडपट्टया यांचे दारुण वास्तव एखाधा चलचित्राप्रमाणे घडविले आहे. म्हणाजेच मुंबईचा वैभवाने मढविलेला चेहरा अण्णाभाऊंनी भीषण विषमतेने कसा विद्रूप केला आहे. याची जाणीव प्रस्तुत लावणीतून होते. मुंबईतील विषमतेचे व भीषणतेचे दर्शन घडविताना अण्णाभाऊ लिहितात.

" फोरास रोड, तीन बत्ती । गोलपिठा नाक्यावरती ।
शरीर विकुन कितीएक पोट भरती ।। ८ ।।[8]

अशारितीने अण्णाभाऊ सामान्य जनांच्या भिषणतेचे व बकाल वस्तीचे चित्रण करुन थांबलेले नाहीत. तर हे जीने बदलण्यासाठी बंडाचा लाल झेंडा घेऊन नवा मार्ग शोधायचा आहे. यासाठी ते म्हणतात.

" लाल झेंडा घेऊन हाती । करायला इथे क्रांती ।
मजुरांची पिढी नवी पाऊल टाकती ।।
अण्णाभाऊ साठे म्हणे । बदलूनी हे दुबळे जिणे ।
होणार जे विजयी ते रण करती ।। ९ ।।[9]

लावणीच्या वरील विवेचनातून मुंबईतील सामान्य जनांना जीवनां-साठी कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे चित्र अतिशय बोलकेपणाने व्यक्त केलेले दिसते. त्यामुळे त्यांच्या शाहिरी रचनेसंदर्भात सदा कऱ्हाडे लिहितात. " अण्णाभाऊ साठे यांच्या कलानिर्मितीत चिरंतन मूल्य नसेलही कदाचित. पण त्यांनी प्राचीन मराठी शाहिरी काव्यात आधुनिकता आणली. ही गोष्टही तितकीच महत्वाची आहे." ६

३. माझी मैना गावावर राहिली :

प्रस्तुत लावणी ही संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे. या विषयावर आधारित आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत मराठी माणूस प्राणाची बाजी लावून लढत होता. या ऐतिहासिक शौर्य-शाली जनलढयापासून, सामान्य जनतेच्या आशा आकांक्षांशी अण्णाभाऊ एकरूप झाले होते. त्यातूनच प्रस्तुत लावणीची निर्मिती झालेली दिसते.

या लावणीची दोन विभागात रचना केलेली आढळते. पहिल्या विभागात मुंबईचा कामगार, त्याची भाववेडी पत्नी मैना, या मैनेपासून भांडवलशाही जीवनपध्दतीने केलेली कामगाराची ताटातूट, पोटासाठी विरह सहन करून व्याकूळ झालेला मुंबईचा कामगार, त्याच्या मनाची झालेली तगमग, पत्नीच्या मांगल्याने रसरसलेले तिचे सौंदर्य, त्याहूनही तिचे उदात्त असे मन, वाटेल तेवढा दागिना घेऊन येतो. असे म्हणत असतानाही न हसणारी न उमलणारी, मनात खचलेली, डोळयात रुतलेली आणि शेवटी हात उंचावून आर्त निरोप घेणारी मैना. आणि अशा या मैनेला सोडून मुंबईच्या बेकारीत भर घालण्यासाठी आलेला श्रमजीवी कामगार, जशी मढयावर मुठभर माती पडावी. तशी या कामगाराची झालेली अवस्था याचे उत्कृष्ट दर्शन लावणीच्या पूर्वार्धात आढळते. तर दुसऱ्या विभागात मुंबईत सुरु झालेली संयुक्त महाराष्ट्राची

चळवळ, या चळवळीमुळे बेभान झालेला मराठी कामगार आणि आपल्या गावाकडे राहिलेल्या मैनेसारखी अवस्था झालेली जनता म्हणजे बेळगांव, कारवार, निपाणी व गोव्यातील मराठी जनता याचे चित्रण केले आहे.

अण्णाभाऊंनी या लावणीत निर्माण केलेली ही नायिका समग्र मराठी लावणी वाङ्मयातील नायिकांशी तुलना करून पहाण्यासारखी आहे. तिचे वर्णन करताना अण्णाभाऊंच्या शब्दकलेला बहर येतो, ते लिहितात -

" ओतीव बांधा । रंग गव्हळा । कोर चंद्राची ।
उदात्त गुणाची । मोठया मनाची । सीता ती माझी
रामाची ।
हसून बोलायची । मंद चालायची । सुगंध केतकी ।
सतेज कांती । घडीव पुतळी सोन्याची । नव्या नवतीची
काडी दवण्याची । रेखीव भुवया । कमान जणू
इंद्रधनूची ।
हिरकणी हि-याची । काठी आंधळ्याची । तशी
ती माझी गरिबाची । "[७]

वरील विवेचनावरून अण्णाभाऊंनी उभी केलेली नायिका ही समस्त मराठी लावणी वाङ्मयातील नायिकेच्या इतिहासातील वेगळी अशी नायिका आहे. यातून अण्णाभाऊंच्या शाहिरी रचनेचा वेगळेपणा लक्षात येतो.

अण्णाभाऊंचे या लावणीतील समाजजीवनाविषयीचे असणारे सूक्ष्म आकलन, त्यांच्याजवळ वर्गीय जाणिवेची असणारी खोली, सामान्यांच्या व्यथांचे मूळ शोधून त्याचा उगमच नष्ट करण्यासाठी चाललेली धडपड, मढयावर मूठभर माती पडावी. यासारखे दुर्दैवी जीवन जगूनही विद्रोहाचा वणवा घेऊन पेटलेली आशावादी जीवनधारणा हे सर्व पाहिले म्हणजे अण्णाभाऊंच्या तरल, तेजस्वी प्रतिभेचा

उत्कृष्ट अविष्कार नजरेत भरतो.

या लावणीची ओघवती शैली आणि वेगवेगळया वापरलेल्या प्रतिमा या मुळात पहाण्यासारख्या आहेत. त्यांच्या शैलीसंदर्भात नारायण सुर्वे लिहितात, " अण्णाभाऊंची शाहिरी रचना घ्या किंवा कथा- कादंब-या पहा. त्यांना त्यांची म्हणून स्वतःची शैली आहे.[8] " कोर चंद्राची " किंवा " सीता माझी रामाची " असे म्हणत असताना पौराणिक संदर्भ देऊन नायक-नायिकेला व त्यांच्या विरहकथेला उदात्ततेच्या शिखरावर नेऊन पोहोचविलेले दिसते. तसेच " पुतळी सोन्याची " " काडी दवण्याची " "हिरकणी हि-याची " " काठी आंधळयाची तशी माझी गरिबाची " या सारख्या प्रतिमा नायकाच्या मैनेवरील सखोल प्रितीचे दर्शन घड-विणा-या आहेत. शेवटी शाहिराने शिवशक्तीला केलेली विनवणी म्हणजे अण्णाभाऊंच्या ध्येयवादाचे दर्शन घडते. पारंपरिक लावणी-तील रचनावैशिष्टये स्वीकारली. मात्र आशय कसा अमुलाग्र बदलून टाकला. याचा प्रत्यय वरील लावणी वाचताना येतो.

४. कथा मुंबईची :

या लावणीमध्ये अण्णाभाऊंनी मुंबईतील लोकजीवनाचे चित्रण प्रखर शब्दात व्यक्त केले आहे. एका बाजूला श्रीमंत, कुबेराची वस्ती, तर दुस-या बाजूला मोकळया गलीच्छ जागेत गाढवावाणी लोळणा-या झोपडया, या झोपडीत रहाणारी व भीक मागून खाणारी माणसे आणि त्यांच्या समोरुन पळणा-या रंगीत मोटारगाडया. अशा सामाजिक विषमतेचे रेखाटलेले चित्र हे हृदयस्पर्शी आहे.

## ५. सातार्‍याची त-हा :

या लावणीमध्ये अण्णाभाऊंनी सातारी माणसाच्या जगण्याच्या विविधवृत्ती-प्रवृत्तीचे दर्शन घडविलेले दिसते. सातारी माणसाची बालेघाटी बोली, टाचेवर चालण्याची पध्दत, पटक्याची न्यारी धर्ती आणि जगण्याचा एक वेगळाच ढंग रेखाटला आहे.

अण्णाभाऊंच्या आणखी इतर लावण्यांचा विचार " अण्णाभाऊ साठे यांच्या लोकनाटयातील आशयाचे स्वरूप " या प्रकरणामध्ये झाला आहे. लोकनाटयातील कथानकाला अधिक रंगतदारपणा येण्या-साठी व आपली वैचारिक भूमिका पटवून सांगण्यासाठी कथानकाला अनुसरून त्या लावण्यांची निर्मिती केलेली आहे.

लावणीचा एक प्रकार म्हणजे छक्कड. यालाच " झगडा" असे म्हटले जाते. याही रचनेचा मोठा कौशल्यपूर्ण वापर अण्णाभाऊ साठे यांनी केला आहे. यातून श्रमिक व भांडवलदार, गरीब व श्रीमंत यांच्या तोंडी वेगवेगळे संवाद आणून " झगडा" लावणी" निर्माण केलेली दिसते. या प्रकारामधून वर्गीय जाणीव त्वेषाने व्यक्त झालेली दिसते. व भांडवलदार, सावकार, शेटजी, भटजी यांच्यास्वार्थीवृत्तीवर व आपमतलबीपणावर कोरडे ओढलेले दिसते. उदाहरणार्थ त्यांच्या " शेटजीचे इलेक्शन " या लोकनाटयामध्ये वर्गीय जाणीव पुढील प्रकारच्या " झगडा-लावणीतून व्यक्त होताना दिसते.

" सत्तू -नोकरशाहीला । हाकलायाला । एकी देशामध्ये
कराल का ? ।।
मगरचंद-मुसलमानाचा । स्वनिर्णयाचा । वेडा हट्ट कोण
पुरवील का ? ।। १ ।।

.....

मगरचंद -पचेल ते खावं । शोभेल ते ल्यावं । भलतं सलतं
काय मागू नका ? ।। ३ ।।

सत्तू-पोटाला पोटभर । मिळाया भाकर । जमीन घरोघर
वाटाला का ? ।।
मगरचंद-तुझं हे बोलणं । तिरकस चालणं । सांग कोणाला
पटल का ? ।। ४ ।।
सत्तू - कर्जमाफीचा । ( सावकारांच्या) जमीन जप्तिचा ।
कायदा सक्तिचा आणाल का ? ।।
मगरचंद - असं कुठं झालं । कुणी पाहिलं । याला पुरावा
देशील का ? ।। ५ ।।[१]

वरील प्रकारच्या लावणीतून वर्गीय जाणीव जशी त्वेषाने प्रकट झालेली आहे. त्याबरोबरच सामाजिक विषमतेचे दाहक रूप प्रत्ययास येते.

एकूणच अण्णाभाऊंच्या लावणी वाङ्मयाचा विचार करता त्यांची लावणी ही लौकिक आहे. पण ती काल्पनिक, प्रेमावर उत्तान शृंगारावर आधारलेली नाही. तर विषयात आणि आशयात कमालीची बंडखोरी निर्माण केली आहे. तसेच वास्तवाचा ताजा अविष्कार त्यांच्या लावणीतून पहावयास मिळतो. त्यामुळे अण्णाभाऊंची लावणी ही समकालीन जीवनाचे प्रखर वास्तवाचे चित्रण करते.

## ४. पोवाडा

अण्णाभाऊंनी पोवाडयाची निर्मिती करताना पारंपरिक पोवाडयातील कोणती वैशिष्टये स्वीकारली. अण्णाभाऊंच्या पोवाडयाचे स्वरूप कोणत्या प्रकारचे आहे. याचा विचार करू.

अण्णाभाऊंनी समकालाशी एकरूप होऊन अनेक घटना आणि व्यक्ती यावर आधारित पोवाडयांची रचना केलेली आढळते. अण्णाभाऊंनी एकूण पंधरा पोवाडे लिहिले आहेत. अशी नोंद असल्याचे आढळते. पण आज प्रत्यक्षात नऊ पोवाडे उपलब्ध आहेत.

१. स्पेनचा पोवाडा - १९३६ अनुपलब्ध
२. नानकिंग नगरापुढे - १९४२ अनुपलब्ध
३. स्तालिनग्राडचा पोवाडा- १९४२.
४. बंगालची हाक - १९४४ .
५. बर्लिनचा पोवाडा - १९४६.
६. पंजाब दिल्लीचा दंगा - १९४७ .
७. तेलंगणाचा संग्राम - १९४७.
८. महाराष्ट्राची परंपरा - १९४७ .
९. अमळनेरचे अमर हुतात्मे - १९४७.
१०. मुंबईचा कामगार - १९४९.
११. काळया बाजाराचा पोवाडा - १९४९.

१. स्पेनचा पोवाडा :

उपलब्ध माहितीवरुन अण्णाभाऊंचा हाच पहिला पोवाडा १९३६-३७ मधील असावा. पण तो आज उपलब्ध नाही.

२. नानकिंग नगरापुढे

हा अण्णाभाऊंचा पहिला पोवाडा असावा. असे कॉ. श्री. अ. डांगे यांचे मत आहे. पण हा पोवाडा आज उपलब्ध नाही. चीनमध्ये मार्क्सवादी फौजा सशस्त्र उठाव करीत होत्या. जेव्हा त्या विजयी होऊन " नानकिंग नगरापुढे " उभ्या राहिल्या. तेव्हा याच पार्श्वभूमीवर अण्णाभाऊंनी प्रस्तुत पोवाडयाची रचना केलेली दिसते.

या पोवाडयामध्ये चीनमधील शूर सैनिकांच्या लढयाचा तपशील देऊन त्यांच्या यशाचे गौरवगीत या पोवाडयाच्या रुपाने गाईले आहे.

### ३. स्तालिनग्राडचा पोवाडा :

प्रस्तुत पोवाडा हा सात चौकी आहे. या पोवाडयामुळेच ते कम्युनिस्ट वर्तुळात जास्त लोकप्रिय बनले. कम्युनिस्ट पार्टीने दोन लाख फंडाची घोषणा केली. तेव्हा मुंबईच्या पार्टी सभासदांत पार्टी-साठी आपले सर्वस्व देण्याची चढाओढ लागली, पण अण्णाभाऊंच्या-कडे देण्याजोगे काही नव्हते. पण त्यांच्याजवळ क्रांतीकारक काव्याचा बहुमोल ठेवा होता. तोच त्यांनी पार्टीला अर्पण केला. व पार्टीने याचा मोठया आनंदाने व अभिमानाने स्वीकार केला. यावेळेपासूनच अण्णाभाऊ प्रसिध्दीच्या प्रकाशझोतात आले. कम्युनिस्ट चळवळींचा लेखक, गायक, शाहीर या नात्याने या पोवाडयामुळेच त्यांचे चळवळींशी संबंध वाढले. दरम्यान शाहीर अमरशेख, शाहीर द. ना. गव्हाणकर हे मित्र त्यांना भेटले. आणि त्यातूनच पुढे" लालबावटा" व कलापथकाची निर्मिती झाली.

प्रस्तुत पोवाडयात अतिशय सहजपणे व्यक्त झालेली त्यांची प्रभावी शैली कोणत्याही रसिकवर्गाला मुग्ध करणारी आहे. साध्या कामगाराला देखील समजेल आणि उमजेल असा भाषेचा सोपेपणा जिव्हाळा यामध्ये आढळतो. " स्तलिनग्राडच्या" लढाईच्या व दुस-या महायुध्दातील रशियाविरूध्द हिटलरची नाझी फौज यांच्या युध्दाचा तपशीलवार अभ्यास करून अण्णाभाऊंनी प्रस्तुत पोवाडयाची रचना केलेली दिसते. रशीयन सेनापतींची, सेनाप्रमुखांची आणि शहरांची नावे तुलनेने उच्चा-रण्यास अवघड आहेत. तरीही प्रयत्नपूर्वक ती बसविली आहेत. कम्युनिस्ट पार्टीच्या प्रसाराचा एक भाग, रशियन क्रांतीच्या लढाईचा, विजयाचा आणि नाझीसारख्या भस्मासूराचा दारूण पराभव कसा झाला. याचा साद्यंत इतिहास या पोवाडयाच्या चौका चौकात क्रमश: वर्णिलेला आहे.

या पोवाडयाच्या वाचनावरुन असे वाटते की तत्कालीन रशियन समाजवादी विचारावर श्रध्दा ठेवणा-या कामगारांना हा पोवाडा निश्चितच प्रेरणादायी वाटावा असा आहे. नाझी फौजा हया फ्रान्स व फ्रंटचा पाडाव करीत रुमानिया, बल्गेरिया, सर्बिया, ग्रेक, नॉर्विया आणि डेन्मार्क जिंकत जिंकत ग्रेट ब्रिटनला जाऊन करार केला व सोवियत रशिया विरुध्द बेत आखीत वाटचाल करीत या फौजा पुढे आल्या. अनाक्रमणाचा करार मोडून त्यांनी रशियांवर हल्ला चढविला. रशियातील सर्व शहरे युध्दाची रण-मैदाने बनली. मॉस्को, लेनिनग्राड, स्तालिनग्राड या शहरातून रक्ताचे पाट वाहू लागले. बलात्कार, अत्याचार, लूटालूट यांचा कहर झाला. याचे वर्णन करताना अण्णाभाऊ लिहितात -

" अबलांच्या लुटती शिलाला ।
कम्युनिस्ट म्हणून युवकांच्या तोडिती हाताला ।।
बलात्कार आणि खूनाला ।
नाही दाद अत्याचाराला ।
पराजित रशिया जुलूमाने गनिम हो झाला ।। जी जी ।। [10]

स्तालिनग्राडवर नाझी फौज तूटून पडली. शहरामध्ये घुसून या फौजेने हाहाकार माजवला. दरम्यान स्तालिनग्राडमधील प्रत्येक स्त्री-पुरुष रणझुंजार बनले. मातीचा कण न कण स्वातंत्र्यासाठी अखंड झुंजत राहिला. कित्येक स्त्रिया शौर्याने लढण्यासाठी पुढे आल्या.

" नाझींनी कपटनीतिचा खेळ सुरु केला ।।
लाल वेश दिला नाझींनी आपल्या फौजेला ।।
लाविली सोविएत चिन्हे रणगाडयाला
.,.... ....
रणगाडयाखाली जर्मन कैक रगडला ।।
जनतेच्या अभेद्य फळीचा भेद नाही झाला ।। "[11]

अशा अवस्थेत निसर्गानेही स्तलिनग्राडच्या जनतेला साथ केली.

हिवाळा सुरु झाला आणि वोल्गा नदीचे पाणी गोठले. सर्व प्रदेश बर्फमय झाला. २० नोव्हेंबर रोजी नाझीवर चढाई करण्याचा लाल सेनेला इशारा मिळाला. नाझी फौजेची कोंडी झाली. रशियाच्या बासष्टाव्या फौजेने नाझी फौजेवर चाल केली. शेवटी त्यांना शरण येण्याविषयी मुदत दिली. परंतु हिटलरने शरण न जाण्याविषयी आदेश दिला. तेव्हा पुन्हा घनघोर युध्द झाले आणि लालसेनेच्या पुढे " वॉलेशासाहेब" शस्त्र खाली ठेवून १६ सेनापतीसह तो शरण आला व नाझींचा पाडाव झाला. एकंदरीत रशियन सैनिकांनी स्तालिनग्राड शहर प्रयत्नाने झुंजविले. याचे उत्कृष्ट दर्शन प्रस्तुत पोवाडयातून घडते.

या पोवाडयाची धावती रचना, ओघवती शैली आणि मांडणीतील विविधता यामुळे हा पोवाडा रसिक मनाची पकड घेणारा आहे. पोवाडयातील वापरलेल्या वेगवेगळया प्रतिमा, उपमा हया अण्णाभाऊंच्या भावी लेखनाच्या समर्थ खुणा दर्शवितात. पोवाडयाची चाल ही प्रत्येक चौकाचौकाला बदलत जाते. " फितुरीची डाकीण" सारखी प्रतिमा. " पराजयाने भांबावून वरिष्ठांचे पत्रउलटे वाचणारा नाझी सेनापती, गनिम होऊन पाठीमागे लागलेले ओढेनाले, झाडे, जंगले तसेच दिव्याने पतंगावर झेप घालावी तशी स्तालिग्राड शहरावर झडप घालणारी नाझी फौज अशा काही प्रतिमांतून अण्णाभाऊंच्या दिव्य प्रतिभेचे दर्शन घडते. एकूणच आंतरराष्ट्रीय वर्गसंबंधाशी आपले नाते जुळवू पाहणारा अण्णाभाऊंचा हा पोवाडा त्यांच्या सखोलतेची जाणीव करुन देतो.

## ४. बर्लिनचा पोवाडा :

रशियातील जुन्या राजवटीचा पाडाव होऊन कम्युनिस्ट लोकांचा प्रभाव कसा वाढत गेला. याचे उत्कृष्ट दर्शन प्रस्तुत पोवाडयातून घडविले

आहे.

एका अर्थाने रशियन फौजेच्या पराक्रमाची थोरवी या पोवाडयामध्ये वर्णिलेली आहे. हिटलरचे नाझी सैन्य, त्यांचा सेनानी " फॉन हॅाथ " याला टक्कर देणारा रशियाचा " झुकोव्ह" आणि त्याचे सहकारी रेजिव्ह किव्ह, रकोसोविस्की, कॅन्हिव्ह, जर्मनीचा दिमीगोव्ह यानी रशियाच्या रक्षणासाठी उभारलेला लढा याचे दिव्य दर्शन घडते. स्तालिनग्राड, लिथुआनिया, रूमानिया, बल्गेरिया, वार्सा, प्रसिया, कॅाकोव्हला, टिलसिट व टिनलबर्ग इत्यादी स्थाने ओलांडून रशियन फौजा बर्लिनवर चाल करून गेल्या. आणि बर्लिन जिंकून जगातील पहिले रणयुध्द त्यांनी लढविले. याचे वीररसा-नेयुक्त वर्णन या पोवाडयामध्ये आढळते.

हा पोवाडा वाचताना गद्यप्राय वाटतो. कोणालाही समजेल आणि उमजेल अशी याची भाषा आहे. त्यामुळे तत्कालीन कामगारांच्या वर्तुळात हा पोवाडा अधिक लोकप्रिय ठरला. या पोवाडयातील बर्लि-नच्या रशियन फौजेचा लढा म्हणजे जागतिक लोकशाहीच्या रक्षणासाठी आणि मानवतेच्या मुक्तिगाथेचा सार्यंत इतिहास यासाठी चाललेला लढा आहे याची नोंद अण्णाभाऊ करतात.

५. बंगालची हाक :

प्रस्तुत पोवाडयातून अण्णाभाऊंची राष्ट्रभक्ती जाज्वल्याने व्यक्त होते. त्यामुळे हा पोवाडा म्हणजे अण्णाभाऊंच्या राष्ट्रभक्तीचे कोरीव लेणेच आहे. बंगालमध्ये दुष्काळ पडल्यानंतर उपासमारीने थैमान घातले. अनेक माय-बहिणींना स्वत:चे शील विकूनही मुलाबाळांचे पोट भरता येईना. सर्वसामान्य कष्टकरी माणसांची अवस्था दयनीय बनली.

भूकेने व्याकूळ झालेल्या गरीब जनतेचे वर्णन करताना अण्णाभाऊ लिहितात.

" कोण अन्न शोधाया गेला हिंडून फार थकला ।
नाही अन्न मिळालं त्याला ।
निराश फार जाहला ।
झाडाखाली प्राण सोडून मोकळा झाला ।।
पिळूके देत देहाला । तडपडे कोण वाटेला ।
..........
मुडद्याची लागली रांग कलकत्त्याला ।।
...........
शतकानुशतके ज्यानं । गाजविले शौर्य दारुण ।।
त्याचा देह कोल्हयानं । निर्भय केला भक्षण ।।"[१२]

तेव्हा अशा नैसर्गिक आपत्तीच्या वेळी सारे भारतीय बांधव छातीची ढाल करून आधार देऊया. भारताच्या पूर्वेकडील लढाऊ तटबंधीतील निराशा झटकून ती अभेद्य ठेवू या. आणि दुष्काळाचा फायदा घेऊन शोषण करणाऱ्या व्यापाऱ्यांचा नंगा जिरवूया व बंगाली माणसाला आपल्या माणुसकीचे दर्शन घडवूया. असे स्पष्ट आवाहन प्रस्तुत पोवाडयातून अण्णाभाऊंनी केले आहे. हा पोवाडा शाहीर अण्णाभाऊ, गव्हाणकर आणि अमरशेख गात असल्यामुळे रसिकांच्या थेट अंत:करणापर्यंत जाऊन भिडणारा असा आहे. या पोवाडयातील भाषा अगदीच सोपी व सरळ अशी आहे.

६. पंजाब दिल्लीचा दंगा

स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी ब्रिटिशांनी हिंदू-मुस्लीम अशी जातीयवादी संघर्षाची बीजे भारतीयांच्यामध्ये रुजविली. त्यामुळे पंजाब आणि दिल्लीत मोठी दंगल उसळली. या दंगलीना अण्णाभाऊंनी प्रस्तुत पोवाडयातून विरोध केला आहे.

बंगालच्या फाळणीनंतर हिंदू-मुसलमान यांच्यातील संघर्ष वाढत गेला. पाकिस्तानातून जे अनेक निर्वासीत लोकांचे लोंढे भारतात आले. ते त्यांच्या धर्मांधतेमुळे. त्यामुळे या जातीयवादी शक्ती आणि संस्थानिकानी दिलेली धर्माधाची हीन वागणूक यामुळे भारतातील मुस्लीमांच्यावर त्यांचा रोष होता. यामुळे जागोजागी हिंदू मुसलमानांचे दंगे उसळू लागले. विशेषत: पंजाबातील दंगलीने उग्र रूप धारण केले. मृत्यूने थैमान घातले. शिख, हिंदू, मुसलमान वै-याला ( ब्रिटिशांना ) पूर्ण विसरुन एकमेकांच्या सुडाचे धुंद झाले. याचे वर्णन प्रस्तुत पोवाडयात आहे.

७. तेलंगणाचा संग्राम :

तेलंगणमधील कष्टकरी जनतेने हैदराबादच्या निझामाच्या सत्ते-विरुध्द दिलेला लढा या पोवाडयातून अविष्कृत केला आहे. या तेलंगणमधील जनतेने दिलेल्या लढयाला साथ देण्याचे आवाहन अण्णा-भाऊंनी प्रस्तुत पोवाडयामध्ये केले आहे.

वर्षानुवर्षे ब्रिटिशांना मदत करुन, सामान्य-कष्टकरी रयतेवर दहशत बसवून गावकर, सावकार, नफेबाज, वतनदार याना हाताशी धरुन सरंजामदारी व वेठबिगारीची पध्दत तशीच अबाधित ठेवून अनेकांना गुलाम बनवू पहाणा-या निझामाच्या सत्तेविरुध्द तेलंगण-मधील शोषीत जनतेने मुक्तिचा लढा आरंभिला आहे. दोन कोटी लोकसंखयेचे निझामाचे राज्य. या राज्यात जनता हैराण झाली आहे. दारिद्र्याचा अंधार चोहीकडे पसरला आहे. निझामाने गुलामगिरीचे फास सामान्य जनतेच्या गळयाभोवती गुंडाळले आहेत. अशी पिळवणूक जेव्हा टोकाला गेली. त्यावेळी तमाम जनतेने " कसेल त्याची जमीन" असा कायदा करावा आणि सर्व शेतीचे समान वाटप व्हावे. असा

आग्रह धरून बंडाचा झेंडा हाती घेतला. व गेलेल्या जमिनीवर कष्टकरी आपला हक्क सांगू लागला. याचे वर्णन करताना अण्णाभाऊ लिहितात -

" नैझामी राजकर्त्यांना धक्का बैसला ।
बक-याला पाण्यामध्ये सुरा दिसू लागला ।।
वेळीच आळा घालावा विचार त्यांनी केला ।।
पोलिसांना हुकूम त्यानी दिला ।
रझाकार त्यांच्या जोडिला ।

..................

मोंगलाईचे नांव सार्थ ते करिती रझाकार
स्वातंत्र्य जे जे मागती । त्यांना पकडती
टांचा कापिती । अन् चालविती जबरिनं ।
मागून भाले भोकून । मग घेति शेवटी प्राण । "[13]

तेलंगणामध्ये अशी अवस्था झाली. तेव्हा स्वातंत्र्यप्रेमी अण्णाभाऊंनी तेलंगणाच्या लढाऊ शेतक-याला मदत करण्याचे आवाहन समस्त पुरोगामी शक्तीला केले आहे.

निझामाने ब्रिटिश लोकांना वेळोवेळी मदत केली. त्याचे ऐतिहासिक दाखले देऊन निझामाच्या विरोधी जनमत चेतविण्याची कामगिरी या पोवाडयातून केलेली दिसते. युवकांना, लोकशाहीवाद्यांना, देशभक्तांना आणि क्रांतिकारकांना तेलंगणाच्या लढयाला मदत करण्याचे आवाहन प्रस्तुत पोवाडयामध्ये केलेले आहे.

८. <u>महाराष्ट्राची परंपरा</u>

हा पोवाडा सहा चौकी आहे. अण्णाभाऊंच्या इतर सर्व

पोवाडयापैकी हा पोवाडा कलात्मक मुल्यांच्या दृष्टीने अप्रतिम आहे. अण्णाभाऊ मराठी मातीवर, मराठी प्रदेशांवर, येथील वीरपुरूषांच्या शौर्यगाथांवर व मराठमोळया शेतक-यांच्या लढवय्या वृत्तीवर खूप प्रेम करीत होते व त्यांचा विश्वासही होता. या उर्मीतूनच प्रस्तुत पोवाडयाची निर्मिती झालेली दिसते. तसेच मराठी माणसाची प्रादेशिक अस्मिता या पोवाडयातून प्रभावीपणे व्यक्त केली आहे.

" महाराष्ट्र मायभू आमुची । मराठी भाषिकांची ।
संतमहंतांची । ज्ञानवंताना जन्म देणार ।
नवरत्नांचे दिव्य भांडार । समरधिर घेत जिथे अवतार ।।
जी ।। [१४]

या वर्णनातून महाराष्ट्र प्रदेशाच्या वैशिष्टयपूर्णतेचे दर्शन घडते. सहयाद्री पर्वताच्या अनेक रांगा त्याच्या मस्तकावर उभे असलेले सत्तावीस गड, बुरूज आणि करवंदी उभ्या राहिलेल्या आहेत. डोंगराच्या पायथ्याशी असणारी सुपीक जमीन, त्यामधील विविध पिके याचे वर्णन करून कृष्णा, कोयना, पंचगंगा वारणा, गोदा या नद्यांना वंदन केले आहे. व पुढे कोळी, भिल्ल, रामोशी, आदिवासी, मांग या मूळ महाराष्ट्रीयांची नोंद केली आहे. महाराष्ट्रातील सांस्कृतिक आणि भाषिक परंपरेचे दर्शन घडविताना संस्कृतीच्या मक्तेदारांनी मराठी भाषेची केलेली गळचेपी याचेही वर्णन केले आहे. पण ज्ञानेश्वरानी या संस्कृत भाषेची भिंत फोडून मराठी मायबोलीला बाहेर काढले व मराठी भाषेला प्रतिष्ठा मिळवून दिली. अशा ज्ञानेश्वरांना व इतर संताना अण्णाभाऊ वंदन करतात. तसेच महाराष्ट्राचे स्वाभिमानी शिवछत्रपती यांच्या आगमनामुळे महाराष्ट्रात कोणते वातावरण निर्माण झाले. याचेही वर्णन अण्णाभाऊ करतात.

सामाजिक क्रांतीचे अग्रदूत " महात्मा फुले " यांच्या कर्तृत्वाविषयी ते लिहितात.

" महात्मा फुले लाभले महाराष्ट्राला ।।
अन्याय निवारुनि न्याय द्याया दलिताला ।। "[१५]

यानंतर १९४२ मधील नाना पाटलांचे प्रतिसरकार, ग्रामराज्य व अच्युतराव पटवर्धनांचा मुळशीचा सत्याग्रह. बिळाशीचा सत्याग्रह याचे वर्णन करुन फेब्रुवारी १९४६ साली झालेले खलाशांचे मुंबई बंदराचे बंड, त्याला मुंबईतील कामगारांनी दिलेला पाठिंबा याचे उत्कृष्ट वर्णन अण्णाभाऊंनी केले आहे. . शेवटी अखील महाराष्ट्राला संघटीत करुॅन विशाल महाराष्ट्राचे एकत्रीकरणाचे चित्र शेवटच्या कडव्यात रेखाटलेले आहे. या पोवाडयासंदर्भात प्र. के. अत्रे लिहितात. " महाराष्ट्राची बंडखोर परंपरा गाणाऱ्या या पोवाडयात ताजा रसरशीत इतिहास आहे. इतिहासाकडे पाहण्याची नवी दृष्टी आहे पण वाखाणण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यात कोणत्याही उच्च प्रकारच्या काव्याला भूषविणारे सर्व गुण आहेत. त्यात कलेची सफाई आहे. महाराष्ट्राचे वास्तव दर्शन आहे. ते दर्शन देण्याला योग्य असे शब्दही आहेत. " महाराष्ट्राची परंपरा ती पुढती नेण्याला " हे पालुपद प्रत्येक ठिकाणी इतक्या योग्य रीतीने घालण्यात आलेले आहे की ते चट्‌कन हृदयाला जाऊन भिडते. या परंपरेकरिता आपलाही वाटा आपण उचलला पाहिले असे वाटल्यावाचून रहात नाही. महाराष्ट्राची परंपरा पुढे नेण्याकरिता अरबी समुद्राने हसत हसत आगऱ्याच्या आरमाराला वाट दिली. बेचाळीसच्या क्रांतीकारकांना कुशीत घेतले. वगैरे एकाहून एक सरस अशा कल्पना त्यात आहेत"[१६]

अण्णाभाऊ साठे यांच्या या पोवाडयातील महाराष्ट्राच्या भूगोलाचे, निसर्गाचे, सहयाद्री पर्वताचे व गडेकोट किल्ल्याचे केलेले वर्णन हे हुबेहुब आहे. त्यामुळे हा पोवाडा महाराष्ट्राच्या विविधांगी सौंदर्याचे दर्शन घडवितो. तसेच योग्य प्रतिमा, शैलीतील सौंदर्य यामुळे अण्णाभाऊंच्या तरल हृदयस्पर्शी प्रतिभेची साक्ष पटते. महाराष्ट्राची परंपरा भविष्यकाळातही पुढे नेण्याविषयी अण्णाभाऊंनी केलेली विनवणी यातून

त्यांचे महाराष्ट्राविषयीचे प्रेम लक्षात येते.

९. अमळनेरचे अमरहुतात्मे

हा पोवाडा चार चौकी आहे. अमळनेर येथे झालेल्या हत्याकांडाचे प्रभावी वीररसानेयुक्त वर्णन या पोवाडयामध्ये केले आहे. अमळनेरच्या मिलमधील " शेख नथुलाल " या लढाऊ कामगाराला कम्युनिस्ट कार्यकर्त्याला कामावरून कमी केले. त्यावेळी युनियनने एक खलिता पाठवून मालकाला जाब विचारला. व चौकशीची मागणी केली. यातूनच कामगार आणि मालक यांच्यात संघर्ष सुरु झाला. या संघर्षाचे शेवटी कामगारांच्या संपात रुपांतर झाले. हा संप दडपून टाकण्यासाठी कलेक्टरनी अमळनेर या शहरात १४४ कलमाचा अम्मल बसविला. आणि पोलीसांना संपूर्ण अधिकार दिले. मिरवणूक बंदी, सभाबंदी, जमावबंदी जाहीर केली. पण या जमावबंदीचा हुकूम मोडून श्रीपती पाटलाने या जुलमी कायदयाला मोडून काढण्यासाठी लाल ध्वज हाती घेऊन सहा हजार कामगारांचा मोर्चा काढला व कामगार क्रांतीचा जयघोष झाला. दाही दिशा दणाणून निघाल्या. पण अमळनेरच्या मुख्य चौकाला पोलीसानी मोर्चाला चारी बाजूने अडवून धरले. पण कार्यकर्त्यांनी हुकूम मोडून सभेस सुरवात केली. " नरवणे " नावाचे कामगार कार्यकर्ते बोलायला लागले. पण लगेच पोलीसांनी त्यांना अटक करून फरफटत नेले. हे पाहाताच जमाव प्रक्षुब्ध झाला. श्रीपती पाटील विजेच्या वेगाने पुढे होऊन लोकांना शांत राहण्यास सांगू लागले. इतक्यात पोलीसानी गोळीबार सुरु केला. आणि पहिल्यांदाच श्रीपती पाटलाचा बळी घेतला. " फायर फायर " असे साहेब ओरडताच गोळीबार सुरु झाला या गोळीबारात रतन पाटील, गंगाधर भिला पाटील, झुमकीराम मोकल, शंकर मोतीराम, श्रीपती भिला, शंकर धोंडू, सोनुरंगी, बन्सी ही अमळनेरच्या कामगार जगतातील नऊ अनमोल रत्ने ठार झाली. असंख्य कामगार जखमी झाले. या गोळीबाराचे

पडसाद महाराष्ट्राच्या आणि भारताच्या कायदेमंडळात उमटले. सारा भारत या गोळीबाराने थरारून उठला. भारतातील कामगार चळवळ या हत्याकांडाने पेटून उठली. आणि संपूर्ण भारतात चारी-बाजूने वर्गयुध्दाला सुरूवात झाली. न्यायासाठी सर्व जनता पेटून उठली. व लढू लागली याचे रोमहर्षक वर्णन या पोवाडयामध्ये केले आहे.

या पोवाडयातील हत्याकांडाचे वर्णन करताना अण्णाभाऊ श्रोत्याना केवळ इतिहासात गुंतवून न ठेवता काळाच्या स्थितीगतीवर वर्तमानात आणून सोडतात. सर्वसामान्य कामगार जनतेवर अन्याय, अत्याचार झाल्यास याची स्पंदने अण्णाभाऊंच्या मनात लगेच उमटतात. याचे उत्कृष्ट दर्शन प्रस्तुत पोवाडयातून घडते. मंत्र्यांची अकार्यक्षमता, नोकरशाहीची क्रूरता आणि भांडवलदाराची शोषकवृत्ती यांच्याविरूध्द लढणाऱ्या कामगार वर्गाचे जीवंत चित्रण " अमळनेरचे अमरहुतात्मे " या पोवाडयामध्ये घडते.

१०. मुंबईचा गिरणी कामगार :

अण्णाभाऊंनी या पोवाडयामध्ये मुंबईतील गिरणी कामगारांच्या संपाचे वर्णन अतिशय भेदकरित्या केले आहे. तसेच अण्णाभाऊंचा हा पोवाडा म्हणजे १९०८ ते १४ ऑगस्ट १९५० पर्यंतच्या मुंबईतील गिरणी-कामगारांचा ज्वलंत इतिहास आहे.

१९०८ साली टिळकांना अटक झाली. यावेळी मुंबईच्या गिरणी कामगारांनी खवळून निषेध संपाचे वादळ उठविले. आणि " हिंदच्या मुक्तिचे भले शिंग वाजले " कामगारानी संघटीत होऊन चळवळी उभारल्या. १९२८ साली मुंबईतील ८४ गिरण्या बंद पाडणारा ऐतिहासिक संप झाला. हा संप सहा महिने चालू होता. याचा सरकारला राग आला. सरकारने दडपशाहीचे धोरण सुरु केले. पण कामगार पुन: खवळून उठला.

या कामगारांना संघटीत करुन परशुराम जाधव पुढे झाला. पण चळवळीत इंग्रज अधिका-याकडून परशुराम जाधवाची हत्या झाली त्यामुळे कामगार वर्गात कहर उसळला. यावेळी कॉम्रेड डांगे, कॉम्रेड मिरजकर, आणि बॅडले या नेत्याच्या नेतृत्वाखाली भांडवलदाराना बेजार करण्यासाठी वर्ग युध्दाचे रणशिंग फुंकले आणि दोन ऑक्टोबर एकोणीशे चाळीस रोजी मुंबईचा शूर कामगार संघटित होऊन आपल्या हक्क पूर्तीसाठी रस्त्यावर आला आणि खलाशांच्या बंडाला मुंबईतील सर्व कामगारानी पाठिंबा दिला. याचा साधंत इतिहास या पोवाडयामध्ये आला आहे.

अण्णाभाऊंचे असे स्फूर्तीशाली पोवाडे म्हणजे कामगार, शेतकरी व दलितांच्या जीवनसंघर्षात अमोघ अस्त्रे बनतील असेच आहेत. तसेच हे पोवाडे म्हणजे कामगार-दलित वर्गाच्या वर्गीय जाणिवा समृध्द करणारे आहेत. व पुढच्या पिढीला सुध्दा अण्णाभाऊंनी शोषणाविरुध्द लढण्याचा आदेश दिला आहे.

११. काळया बाजाराचा पोवाडा :

या पोवाडयामध्ये अण्णाभाऊंनी व्यापारी लोक जीवनावश्यक वस्तूचा साठा करुन त्या वस्तू काळयाबाजाराने कशा विकतात तसेच नोकर शाही आणि राज्ययंत्रणा या काळयाबाजाराला पोषक बनविण्याचे कसे प्रयत्न करतात याचे उपहासगर्भ दर्शन या पोवाडयामध्ये घडविलेले दिसते. त्यामुळे त्यांचा हा पोवाडा आजच्या वर्तमानकाळालाही लागू पडणारा असा आहे. पोवाडयाच्या शेवटी अण्णाभाऊंनी हा काळाबाजार हटवायचा असेल तर जित्या आईचे दुध प्यालेल्या मराठी माणसाने आपल्या इतिहासातील पराक्रम आठवून काळाबाजार करणा-या व्यापा-याना धडा शिकविला पाहिजे आणि शोषण मुक्तिचे रणयुध्द पेटविले पाहिजे. असा उपायही सुचविला आहे.

शोषण करणाऱ्या शोषक वृत्तीवर तसेच नफेखोरप्रवृत्तीवर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या शाहिरी रचनेच्या अनेक माध्यमातून प्रहार केले आहेत. शोषकवृत्ती संपुष्टात यावी. आणि सर्वसामान्यांना समतेचे जीणे लाभावे. असे अण्णाभाऊंचे स्वप्न होते. आणि हे साकार करण्यासाठी अण्णाभाऊंनी प्रस्तुत पोवाडयातून मराठी माणसाच्या अस्मितेला सरळ सरळ हात घातलेला दिसतो. म्हणजेच या पोवाडयातून अण्णाभाऊ साठे यांनी माणसाच्या वर्तमान जीवनाशी निगडीत असणाऱ्या विविध समस्यावर प्रकाश टाकला आहे.

वरील सर्व पोवाडयांचा विचार करता अण्णाभाऊ साठे यांनी जनतेशी बांधिलकी पत्करुन जनतेच्या प्रबोधनासाठी व त्यांची अस्मिता जागृत करण्यासाठी हेतूपूर्वकच वरील सर्व पोवाडयांची रचना केलेली दिसते. या सर्व पोवाडयातून जातीभेद कामगारांचे शोषन, अंधश्रध्दा, यासारख्या गोष्टीवर हल्ला चढविला आहे व वर्गीय राजकारणाचा, समाजवादी विचारांचा आणि मानवतावादाचा प्रसार तसेच दलित कष्टकरी, कामगार यांच्यात वर्गसंघर्षाची प्रेरणा देणे. हा भाव त्यांच्या वरील सर्वच पोवाडयातून व्यक्त होताना दिसतो. तसेच आंतरराष्ट्रीय राजकीय व सामाजिक जीवनाचे दर्शन घडविले आहे.

५. अण्णाभाऊंची गीते :

शाहीर अण्णाभाऊ साठे यांनी गण, गौळण, लावणी, आणि पोवाडा याबरोबर काही स्फुट रचना केलेली आढळते. या रचनेतून अण्णाभाऊंनी मराठी लोकगीतांच्या परंपरेला नवे परिमाण देऊन लोकभावनेला स्पर्श केला आहे. यामध्ये " एकजुटीचा नेता " " महाराष्ट्र देशा आमुच्या" " उठला मराठी देश" " तू मराठमोळा" " महाराष्ट्रावरुन टाक ओवाळून " " बोलतं कड कपारी " " पूर्वेला जाग आली " " रवि आला लावूनी तुरा" " शिवारी चला" " भाग्याची माऊली " "दुनियेची दौलत सारी " " जग बदल घालुनी

घाव " " तेलाशिवाय जळतो दिवा"

" लवादाचा

ऐका परकार " " साता-याचो त-हा " " जागरणाला या " " चिनी जनांची मुक्तीसेना " " लेनिन शुभनामाचे " " भारताची पहिली दिपावली " " अण्णाभाऊंची ही वरील सर्व गीते प्रसंगपरत्वे विविध कलापथकातून व लोकनाटयातून गाईली आहेत. या सर्व गीतातून त्यांच्या गीतलेखनाचे कौशाल्य प्रकट होते. पारंपरिक लोकगीतांच्या वैशिष्टयांचा स्वीकार करून आपल्या मनातील आशाय त्यातून प्रकट केला आहे. तसेच रचनेत तोच तो पणा आढळतो.

सारांश :

अण्णाभाऊ साठे हे लोकशाहीर आहेत. म्हणून त्यांच्या शाहिरीला जनभावनेचा संदर्भ असलेला दिसतो. सर्वसामान्य जनतेत लोकप्रिय ठरलेल्या अडाण्यातील अडाण्याला समजणा-या साध्या, सोप्या भाषेतील, अनेक अलंकार-रूपकांनी/नटलेले अण्णाभाऊंचे शाहिरी काव्य हे विद्रोही आहे. हा विद्रोह भांडवलदार, सावकार, शोटजी, भटजी यांच्या प्रस्थापित समाजरचने विरूध्दचा आहे. त्यामुळे जनतेशी बांधिलकी पत्करलेल्या अण्णाभाऊंनी जनतेच्या प्रबोधनासाठी हेतूपूर्वक शाहिरी वाङ्मयाची निर्मिती केली. असे म्हणावेसे वाटते. त्यांचे शाहिरी काव्य हे जातीभेद, अंधश्रध्दा, दैववाद, आदिवर हल्ले चढवून वर्गीय राजकारणाचा समाजवादी विचारांचा व मानवतावादाचा प्रसार करणे आणि वर्गसंघर्षाची जाणीव करून देणे. या उर्मीतून आकाराला आलेले दिसते. लोकजागृती आणि समूहशक्तीला आवाहन करण्याची मोठी ताकद अण्णाभाऊंच्या शाहिरी काव्यात आहे. त्यामुळे लोकरंजनातून लोकशिक्षण हे उध्दीष्ट त्यांच्या शाहिरी रचनेतून सिध्द होते.

अण्णाभाऊ हे मार्क्सवादी विचारप्रणाली मानणारे आहेत. त्यामुळे समतावादी विचारानी त्यांचा रोम नि रोम भारलेला आहे.

सभोवतालच्या परिस्थितीतील सामाजिक वेदना, दुःख, दैन्य आणि दारिद्र्य पाहून त्यांच्या क्रांतिकारी विचाराचा पिंड निश्चित झालेला दिसतो. या क्रांतिकारी विचाराचे अंतिम ध्येय शोषणमुक्ती हे आहे, याची प्रचिती त्यांच्या संपूर्ण शाहिरी रचनेतून व्यक्त होताना दिसते.

अण्णाभाऊंनी पारंपरिक गणाचे स्वरूप स्वीकारले. पण या गणाच्या अधिष्टाणामध्ये बदल केला. हा बदल वैशिष्टपूर्ण असा आहे. " गौळण" हा रचना प्रकार वगळून टाकला. यातून अण्णाभाऊंच्या शाहिरी रचनेचे वेगळेपण नजरेत भरते. " लावणी " रचनेच्या बाबतीतही अण्णाभाऊंनी असाच वैशिष्टयपूर्ण बदल केलेला दिसतो. अण्णाभाऊंची लावणी ही उत्तान शृंगारावर आधारलेली नाही तर स्वतःचे असे वेगळे अभिजातपण श्रोत्यांच्या मनावर बिंबवते. लावणीची ओघवती आणि वेधवती शैली, आशयानुरूप येणाऱ्या प्रतिमा ह्या समाजजीवनाचे सूक्ष्म आकलन घडवितात. त्यामुळे अण्णाभाऊंची लावणी ही अधिक सरस दिसते. समकालीन जीवनांतील नवा आशय त्यांनी लावणीमध्ये भरून तिचे स्वरूप वास्तवाधिष्टीत केले. म्हणजे समग्र मराठी लावणी वाङ्मयाची व अण्णाभाऊंच्या लावणीची तुलना केल्यास त्यांची लावणी ही वास्तवलक्षी आहे याची प्रचिती येते.

" मुंबईची लावणी "तील मुंबईच्या नागरीजीवनांतील सामाजिक व आर्थिक विषमतेचे दर्शन हे भावस्पर्शी आहे. मुंबईतील श्रमिकांच्या व पददलितांच्या वाटयाला आलेले दुःख, दारिद्र्याचे जिणे बदलून टाकण्यासाठी त्यांच्याविरूद्द झुंज देण्याचा आदेश या लावणीतून व्यक्त केलेला दिसतो. " माझी मैना गावावर राहिली " या लावणीतून तरी अण्णाभाऊंच्या तरल काव्यप्रतिभेची साक्ष पटते. आपल्या मैनेला गावी ठेवून पोटाची खळगी भरण्यासाठी मुंबईची वाट धरणारा श्रमजीवी

कामगार, पत्नीविरहाच्या जाणिवेने त्याच्या मनाची होणारी काहिली, अनेक दागिन्याने मढवून काढीन. असे सांगुनही तिच्या अंतरीची न उमलणारी कळी, काठी आंधळयाची तशी तीमाझी गरीबाची यासारखे नायिकेचे केलेले वर्णन हे समस्त मराठीलावणी वाङ्‌मयातील नायिकेपेक्षा वेगळे असे आहे. पण ही लावणी रूपकात्मक आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या लढयाचे रसभरीत वर्णन या लावणीत पहावयास मिळते. महाराष्ट्रापासून दूर पडलेली बेळगांव, कारवार, डांग आणि गोव्यातील मराठी जनता म्हणजे या लावणीतील नायिका मैना असे रूपक योजून करून रसाचा उत्कर्ष साधलेला दिसतो. " कथा मुंबईची" लावणीतील मुंबईतील बेकारीचे वर्णन आणि सामाजिक विषमतेचे केलेले चित्रण हे थेट वाचकाच्या अंत:करणापर्यंत जाऊन भिडणारे आहे. तसेच "साता-याची त-हा" या लावणीतील सातारी माणसाच्या जगण्याच्या विविध वृत्ती-प्रवृत्तीचे घडविलेले दर्शन आणि त्यांच्या जीवन जगण्याच्या चालीरिती यांचे केलेले वर्णन यातून अण्णाभाऊंच्या मनोज्ञ वृत्तीचे दर्शन घडते. तसेच अण्णाभाऊंच्या " झगडा-लावणी " या प्रकाराच्या लावण्यातूनही सामाजिक विषमतेवर हल्ला चढविलेला दिसतो.

अण्णाभाऊंचे पोवाडे हे नव्या पुरोगामी विचाराने अविष्कृत झालेले दिसतात. त्यांच्या पोवाडयांची भाषाशैली, रचना, प्रतिमा आणि वीर व करून रसाचा अविष्कार यामुळे त्यांच्या पोवाडयाचे सामर्थ्य वैशिष्टयपूर्ण असे आहे. त्यांचे पोवाडे राजकीय, सामाजिक तसेच काही तात्कालिक विषयावर तर काही मार्क्सवादी विचारप्रणालीचे दर्शक आहेत. " स्पेनचा पोवाडा" " नानकिंग नगरापुढे " " स्तालिनग्राडचा पोवाडा " व " बर्लिनचा पोवाडा " हे चार पोवाडे आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीचे दर्शक आहेत. या पोवाडयातून त्यांच्याठिकाणी असलेली स्वातंत्र्यप्रियता, मानवतावाद आणि आंतरराष्ट्रीय वर्गीय जाणीव याचे दर्शन घडते. " तेलंगणाचा संग्राम " " बंगालची हाक " आणि " पंजाबदिल्लीचा दंगा" या पोवाडयातून अण्णाभाऊंच्या

संवेदनक्षम मनाचे दर्शन घडते व तमाम जनतेला कृतिशील बनविण्याचे आवाहन या पोवाड्यातून केले आहे. " अमळनेरचे अमर हुतात्मे", आणि " मुंबईचा गिरणी कामगार " या पोवाड्यातून वर्गीय दृष्टी प्रभावीपणे अभिव्यक्त झाली आहे. तसेच महाराष्ट्रातील साम्यवादी लढयाचे आणि परंपरेचे दर्शन घडते. " महाराष्ट्राची परंपरा" हा पोवाडा तरी कलात्मक मूल्यांच्यादृष्टीने अप्रतिम आहे. यातून अण्णा-भाऊंचे मराठी मातीवर येथीलसंतपरंपरेवर व वीरपुरूषांच्या शौर्यगाथांवर आणि मराठमोळया शेतक-यांच्या लढयावर अपरंपार विश्वास आणि प्रेम प्रकट होते. यातून महाराष्ट्राच्या परंपरेचा अभिमानपूर्वक गौरव केला आहे. " काळया बाजाराचा पोवाडा " यातून मुंबईच्या मराठी कामगाराच्या अस्मितेलाच स्पर्श केलेला दिसतो. यातून माणसाच्या वर्तमानसमस्येवर व वर्गलढयावर सुचविलेला उपाय हा अभूतपूर्व आहे. त्यांच्या सर्वच पोवाड्यातून मराठीत अपरिचीत असणारी अनेक शहरांची व व्यक्तींची नावे तसेच मार्क्सवादी तत्वज्ञान " पोवाडा" या लोककला प्रकारातून अविष्कृत केल्यामुळे क्वचीत रचनादोष आढळतात. तसेच काही पारंपरिक प्रतिमातून नवे तत्वज्ञान मांडताना भाषेचीही काही ठिकाणी मोडतोड झालेली दिसते. परंतु जरी असे किरकोळ दोष आढळत असले तरी समकालाशी एकरूप होऊन निर्माण झालेले पोवाडे हे अव्वल दर्जाचे आहेत.

अण्णाभाऊंची कृषिगीते, कामगार गीते, कटाव अशी काही स्फुट रचना आहे. यातून अन्यायाची गुलामगिरीची चीड व्यक्त झाली आहे. व ती नष्ट करण्यासाठी अपार ध्येयदृष्टी प्रकट झालेली दिसते. गरीब-विषयी जिव्हाळा, कारूण्य, मानवतावादी दृष्टी व मराठी मातीविषयी माणसाविषयी असलेले प्रेम या गुणांची ओळख त्यांच्या स्फुट रचनेतून होते.

एकूणच अण्णाभाऊंची शाहिरी रचना ही समकालाशी एकरूप होऊन अविष्कृत झाली आहे. वास्तवातील अनेक ताज्या घटना घेऊन, जनतेच्या प्रबोधनासाठी व त्यांच्यामध्ये नवचैतन्य घडवून आणण्यासाठी वरील रचना केली आहे.

## संदर्भटीपा


| | | |
|---|---|---|
| १. | साठे, अण्णाभाऊ | शाहीर, मनोविकास प्रकाशन, मुंबई, आवृत्ती दुसरी- १९८५, पृष्ठ-१७. |
| २. | साठे, अण्णाभाऊ | नवे तमाशे , चंद्रकांत शेटये प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती दुसरी, १९८०, पृ. ९. |
| ३. | साठे, अण्णाभाऊ | शाहीर, मनोविकास प्रकाशन, मुंबई, आवृत्ती दुसरी, १९८५, पृष्ठ. ११७. |
| ४. | तत्रैव, | पृष्ठ. ११७, ११८. |
| ५. | तत्रैव, | पृष्ठ, ११८. |
| ६. | क-हाडे, सदा | अण्णाभाऊ साठे : यांची वगनाटये, लोकराज्य, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विशेषांक, संपादक-दिवाकर गंधे, नोव्हेंबर १९९३. पृ. २२. |
| ७. | साठे, अण्णाभाऊ | शाहीर, मनोविकास प्रकाशन, मुंबई, आवृत्ती दुसरी, १९८५, पृ. १०९. |
| ८. | सुर्वे, नारायण | अण्णाभाऊंच्या कादंब-या, लोकराज्य, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विशेषांक, संपादक- दिवाकर गंधे, नोव्हेंबर १९९३, पृ. १७. |

९. साठे, अण्णाभाऊ     नवे तमाशे, चंद्रकांत शेटये प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती दुसरी १९८०, पृ. ३४-३५.

१०. साठे, अण्णाभाऊ     स्तालिनग्राडचा पोवाडा, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे प्रकाशन, मुंबई १९८५, पृ. १०.

११. तत्रैव,     पृष्ठ. १३.

१२. साठे, अण्णाभाऊ     शाहीर, मनोविकास प्रकाशन, मुंबई, आवृत्ती दुसरी, १९८५, पृ. ८५.

१३. तत्रैव,     पृ. ८८.

१४. तत्रैव,     पृ. १८.

१५. तत्रैव,     पृ. २७.

१६. अत्रे, प्रल्हाद केशव     साप्ताहिक नवयुग, २४.१०.१९४८.